सर्वांसाठी दया आणि प्रेम बाळगा, कारण हेच जगाला सुंदर बनवते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | सोमवार २४ मार्च २०२५ | अंक १०३ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु









# पैशाचे सोंग करता येत नाही, २१०० रुपये.. लाडकी बहीण योजनेबाबत अजित पवार स्पष्टच बोलले

## पैशाचे सोंग करता येत नाही..

. ज्यावेळेस राज्य सरकारची परिस्थिती ही अधिक योग्य होईल, त्यावेळी तुम्हाला २१०० रुपये देणार.मी सगळा राज्याचा हिशोब केला. तुम्ही जसा तुमचा संसार करताना महिन्याचा हिशोब लावता, तसा मला राज्याच्या १३ कोटी जनतेचा ३६५ दिवसाचा हिशोब लावावा लागतो. शेतकऱ्यांना काय द्यायचे, कामगारांना काय द्यायचे, मागासवर्गीयांना, अल्पसंख्यांकांना काय द्यायचे, या सगळ्या गोष्टी पाहाव्या लागतात. सगळी सोंग करता येतात, पैशाचे सोंग करता येत नाहीत. सरकारला ही योजना चालू ठेवायची आहे, त्यामुळे यासाठी आम्ही नवीन पर्याय काढत आहोत, अशी माहिती अजित पवारांनी दिली.

## काय म्हणाले अजित पवार?

नांदेड मधील सभेत बोलताना अजित पवार म्हणाले की, शासनाच्या तिजोरीत पैसे नसल्याचे विरोधक बोलत आहेत, पण तुम्ही गैरसमज करून घेऊ नका. मी आपल्या राज्याचा सर्वात मोठा ७ लाख २० कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर केला आहे. या अर्थसंकल्पात विविध योजनांसाठी योग्य त्या ररतुदी केल्या आहेत. माझ्या लाडक्या बहिणींसाठीही निधी उपलब्ध आहे. विरोधक, ही योजना बंद करतील असे म्हणत होते. अनेक महिला भेटल्या. त्यांनीही मला विनवले की, १५०० रुपये देता २१०० रुपये द्या. मी त्यांना नाही म्हटले नाही



महायुती सरकारच्या लाडकी बहीण योजनेबाबत गेल्या काही दिवसांपासून बरीच चर्चा सुरू आहे. सरकार स्थापन होताच योजनेतील पैसे 1500 वरुन 2100 रुपये करण्याचे आश्वासन महायुतीच्या नेत्यांनी दिले होते. अद्याप पैसे वाढवण्याबाबत कुठलीही घोषणा झालेली नाही. विधानसभेच्या अधिवेशनात सरकारने योजनेतील रक्कम वाढवणार असल्याचे म्हटले आहे, पण कधी वाढवणार? हे मात्र स्पष्ट सांगितले नाही. यामुळे विरोधकांकडून सरकारवर टीका केली जात आहे. अशातच, आता राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी याबाबत महत्वाची माहिती दिली आहे

# बिबट्या हल्ल्यात बैल ठार

अंबाजोगाई : तालुक्यातील मांडवा पठाण येथे बिबट्याच्या हल्ल्यात बैल मृत्युमुखी पडल्याची घटना काल शुक्रवार दिनांक २१ मार्च रोजी सायंकाळी घडली. अंबाजोगाई शहरालगत असलेल्या मांडवा पठाण येथील गावालगत शिक्षक बळीराम आकुसकर यांचे शेती असून नित्य रोजी प्रमाणे संध्याकाळी ८ च्या सुमारास त्यांनी जनावरांना वैरण, पाणी



करुन जनावरे दावणीला बांधून ते अंबाजोगाई येथे वास्तव्यास आले असता शेजारी असलेले शेतकऱ्यांनी त्यांना फोन वर जनावरांचा हबंरडा फोडण्याचा आवाज येत असल्याची माहीती सांगितली . जवळ राहणारे ४, ५ शेतकरी यांनी जनावरांच्या गोठ्याच्या दिशेने धाव घेतली असता बैलाला बिबटयाने पूर्णपणे फाडल्याचे निदर्शनास आले. मूर्त जनावराच्या अंगावर बिबट्याचे पंजे, नखे याचे वण दिसत आसल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. गेल्या अनेक दिवसापासून मांडवा पठाण परिसरात बिबट्याचा वावर असल्याचे बोलले जात आहे याआधीही आकुसकर या शेतकऱ्याचे एक गोरे बिबट्याने मारले होते. तसेच इतरही शेतकऱ्यांचे यापूर्वीही जनावरे बिबठयाचे शिकार झाल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले आहे. तरी या हल्ल्याने परिसरातील शेतकऱ्यामध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. वन विभागाने तपास करुन बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# ११ उत्कृष्ट निवेदक, तीन समाजसेवकांचा सन्मान

बीड : मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या स्वातंत्र्य सेनानी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालयात जिल्ह्यातील उत्कृष्ट निवेदक आणि आदर्श समाजसेवकांचा सन्मान करण्यात आला. महाराष्ट्राचे दिवंगत मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त आणि स्वातंत्र्य सेनानी रामरावजी आवरगावकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त हा कार्यक्रम झाला. जिल्ह्यातील निवेदक डॉ.



सतीश साळुंके, प्रा. अभय पटवारी, सुरेश साळुंके, राहुल गिरी, ज्ञानदेव काशीद, भगवान कांडेकर, गणेश उगले, सचिन जगताप, शेख अब्दुल रहीम मोहीउद्दीन, ज्ञानदेव काशीद आणि कै. श्रावण गिरी यांच्या पत्नी वैशाली गिरी यांना गौरवण्यात आले. आदर्श समाजसेवक म्हणून मोईन मास्टर, महादेव धांडे आणि तत्त्वशील कांबळे यांना सन्मानित करण्यात आले. गुरुवारी (दि. २०) झालेल्या या कार्यक्रमात सन्मानपत्र, ११ हजार रुपयांचा धनादेश, शाल आणि पुष्पगुच्छ देऊन पुरस्कार प्रदान करण्यात आले. महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष राजेंद्र जगताप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. माजी आमदार सिराजोद्दीन देशमुख, प्रा. सुशीलाताई मोराळे आणि ॲड. कृष्णा पंडित प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यशवंतराव चव्हाण आणि रामराव आवरगावकर यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. वाघमारे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. गौरी नाईक यांनी केले.

# माणसांच्या मित्राला माणसाचा आजार जडला, कुत्रे बनले मधुमेहाची शिकार

शिर्डीत साईनगरीत आता भटक्या कुत्र्यांचा प्रश्न गंभीर बनलेला असतो. साई मंदिर परिसरातील भटक्या कुत्र्यांचा प्रश्न गंभीर बनला आहे. या कुत्र्यांना डायबिटीजचा आजार झाला असल्याचे उघडकीस आलेले आहे.त्यामुळे या परिसरात फिरणाऱ्या भटक्या कुत्र्यांना खायला देऊ नका असे आवाहन भक्तांना करण्यात आले आहे. शिर्डीतील साई मंदिर परिसरातील भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. एकीकडे साईभक्तांची मोठी गर्दी होत असतानाही हे कुत्रे रस्त्यावर ठिकठिकाणी सुस्तपणे पडून



असतात.त्यामुळे यांची कारणे शोधण्याचा प्रयत्न केला असता या कुत्र्यांना चक्क डायबिटीज झाल्याचे उघडकीस आले आहे. साई मंदिरात आलेले भक्तमंडळी या कुत्र्यांना बुंदीचे लाडू, पेढे, बिस्कीट खायला देत असतात. मात्र, हा आहाराच कुत्र्यांच्या जीवावर बेतत आहे मधुमेहासह जडल्या विविध व्याधी सतत गोड पदार्थांच्या सेवनाने साई मंदिर परिसरात भटकणाऱ्या कुत्र्यांना मधुमेह, सुस्ती, केसगळती आणि लठ्ठपणा अशा व्याधी जडल्याचे समोर आले आहे. साई मंदिराच्या दीड किलोमीटर परिघातील श्वान लठ्ठ झाले आहेत. त्यांचे वजन वाढल्याने हे श्वान कायम एका ठिकाणी सुस्तपणे पहुडल्याचे चित्र दिसत असते. याउलट दोन किलोमीटर परिघाबाहेरील श्वान मात्र तरतरीत असल्याचे उघड झाले आहे. हा विरोधाभास टळकपणे नरजेस आला आहे. मात्र सहज अन्न उपलब्ध होत असल्याने साई मंदिर परिसरातील भटक्या कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. साईभक्त किंवा शिर्डी ग्रामस्थांनी कुत्र्यांना गोडधोड खाऊ घालू नये असे आवाहन पशुवैद्यकीय अधिकारी सुशील कोळपे यांनी केले आहे..

# शिवसैनिक खवळले, रात्री स्टुडिओ फोडला, कुणाल कामराला आज ११ वाजता चोपण्याची धमकी



शिवसेना नेता संजय निरुपम यांनी कॉमेडियन कुणाल कामराला धमकी दिली आहे. आज सकाळी 11 वाजता कुणाल कामराला चोपणार असा इशारा निरुपम यांनी ट्विटमधून दिला आहे. संजय निरुपम हे शिवसेना शिंदे गटाचे नेते आहेत. कुणाल कामरा याने महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबद्दल गाण्यातून आक्षेपार्ह टिप्पणी केली आहे. संजय निरुपम यांनी मारहाण करण्यासंबंधीच हे ट्विट रविवारी केलं. कुणाल कामरा हा स्टँअप कॉमेडियन आहे. त्याने एका गाण्याच्या माध्यमातून एकनाथ शिंदे यांना गद्दार म्हटलं. एकनाथ शिंदे यांच्याबद्दल आक्षेपार्ह गाण्यानंतर खवळलेल्या शिवसैनिकांनी द युनिकॉन्टीनेंटेल हॉटेलमध्ये तोडफोड केली. या हॉटेलमध्ये कुणाल कामराचा स्टुडिओ होता. शिंदेंच्या शिवसैनिकांनी जे हॉटेल फोडलं, त्यात आता पुन्हा स्टँडअप कॉमेडी होणार नाही. रात्रीच शो चे बॅनरही हटवण्यात आले. एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनपर गाणे कॉमेडियन कुणाल कामरा याने रचले होते. हॉटेलमध्ये घुसून स्टुडिओ फोडला त्यानंतर राहुल कनाल यांच्यासह शिवसैनिक आक्रमक झाले. त्यांनी 'द युनिकॉन्टीनेंटेल हॉटेल'मध्ये घुसत स्टुडिओची तोडफोड केली. याप्रकरणी शिंदेच्या शिवसैनिकांवर गुन्हा देखील दाखल झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या हॉटेलची तोडफोड याअगोदर देखील अनेकदा झाली आहे,

## कोणाला अटक झाली?

या तोडफोडी प्रकरणी शिवसेना नेते कुणाल सरमळकर यांना खार पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. कुणाल कामराच्या स्टुडिओमध्ये तोडफोड केल्यानंतर कुणाल सरमळकरला पोलिसांनी काल रात्री ताब्यात घेतले आहे. कुणाल सरमळकरला खार पोलिस ठाण्यात ठेवण्यात आले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार २४ मार्च २०२५
https://lokaarambh.com



सं पा द की य

## सुनीता विलियम्सची घरवापसी

पान जागे फूल जागे, भाव नयनीं जागला चंद्र आहे साक्षीला! प्रसिद्ध गायिका आशा भोसले यांनी गायलेले, सुधीर फडके यांनी संगीतबद्ध केलेली गाणी आज आठवली. निमित्त ठरले, भारतीय वंशाच्या अमेरिकी अंतराळयात्री सुनीता विलियम्स अखेर २८६ दिवसांनंतर पृथ्वीवर परतल्या. भारतीय वेळेनुसार बुधवारी पहाटे ३.२७ वाजता अमेरिकेतील फ्लोरिडाच्या समुद्रात स्पेसक्राफ्ट उतरले आणि त्यानंतर आता जगभरात सुनीता विलियम्स सुखरूप परतल्याची चर्चा सुरू झाली आहे. अंतराळात या नऊ महिन्यांच्या प्रवासात सुनीता विलियम्स या काय करत होत्या. कशा राहिल्या असतील, याबद्दल प्रत्येक भारतीयांच्या मनात एक उत्कंठा आहेच. पण, चंद्रावर पाय ठेवणाऱ्या अंतराळवीरानंतर, संशोधन करण्यासाठी गेलेल्या सुनीता विलियम्स यांची टीम काय करत आहे, याची चर्चा पृथ्वीभोवती फिरणाऱ्या चंद्रासह अन्य ग्रहांनाही असणार, अशी कल्पना केली तर त्यात वावगे ठरणार नाही. हिंदू धर्मग्रंथात या ग्रहांना देवतेचा मान दिलेला असला तरी, वैज्ञानिकदृष्टीने अंतराळात गेलेली सुनीता सुद्धा श्रद्धाळू होती, हे लपून राहिलेले नाही. तिने आपल्यासोबत गणपतीची मूर्ती नेली होती. रामाचे स्मरण ती नेहमी करते, असे तिच्या कुटुंबीयांचे म्हणणे आहे. सुनीता विलियम्स यांच्या वडिलांचे नाव दीपक पंड्या. गुजरातमधील मेहसाणा गावाचे ते रहिवासी. पंड्या यांनी अहमदाबाद येथून डॉक्टरकीचे शिक्षण घेतल्यानंतर थेट अमेरिका गाठली. येथेच त्यांनी स्लोवेनियाई वंशाच्या महिलेशी लग्न केले. यानंतर या दाम्पत्यांच्या पोटी सुनीता यांचा जन्म झाला. लहानपणी सुनीता यांना प्राण्यांबाबत ओढा होता. याच कारणामुळे आपण जनावरांचे डॉक्टर व्हावे अशी त्यांची इच्छा होती. पशुवैद्यक अभ्यासक्रमासाठी त्यांनी अर्जही केला होता. पण, त्यांना आवडीचे कॉलेज मिळाले नव्हते. यानंतर सन १९८३ मध्ये त्यांनी थेट अमेरिकेतील नौदलात प्रवेश घेतला. १९८७ मध्ये भौतिक विज्ञानाची पदवी घेतली. ही पदवीच सुनीता विलियम्स यांच्या यशाची पहिली पायरी ठरली. नौदलातील प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्या एक पायलट झाल्या आणि अनेक प्रकारची विमाने उडवली. याच दरम्यान त्यांना जॉन्सन स्पेस सेंटरमध्ये जाण्याची संधी मिळाली. या प्रसंगाने सुनीता यांच्या करिअरला वेगळीच कलाटणी मिळाली. या ठिकाणी त्यांची भेट अंतराळ यात्री जॉन यंग यांच्याशी झाली. जॉन यंग चंद्रावर जाणारे नववे व्यक्ती होते. सुनीता खूप प्रभावित झाल्या. यानंतरच त्यांनी एक एस्ट्रोनॉट बनण्याचा निर्णय घेतला. जॉन यंग यांच्या भेटीनंतर सुनीता विलियम्स यांनी अंतराळ यात्री होण्यासाठी नासात अर्ज केला होता; परंतु त्यांचा अर्ज नाकारला होता. यानंतर सन १९९५ मध्ये त्यांनी फ्लोरिडा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीतून इंजिनीअरींगची मास्टर डिग्री घेतली होती. यानंतर पुन्हा नासात अर्ज केला. यावेळी मात्र नासाने त्यांची निवड केली. पण अंतराळात जाण्यासाठी सुनीता विलियम्स यांना बराच काळ वाट पाहावी लागली होती. आठ वर्षांनंतर म्हणजेच २००६ मध्ये त्यांना पहिल्यांदा अंतराळात जाण्याची संधी मिळाली होती. आता दुसऱ्या मिशनमधून अंतराळवीर सुनीता विलियम्स आणि बुच विल्मोर तब्बल ९ महिन्यांनंतर सुरक्षित पृथ्वीवर परतले आहेत. ५ जून रोजी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर दोघे पोहोचले होते. मात्र त्यानंतर तांत्रिक अडचणींमुळे त्यांना ९ महिने तिथेच राहावे लागले. या कालावधीत तिने अवकाशातून महाकुंभ सोहळा पाहिला. सुनीता विलियम्स यांनी उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभमेळ्याचा फोटो कुटुंबीयांना पाठवला होता. तसेच या मोहिमेदरम्यान त्यांनी ९०० तासांचे संशोधन आणि १५० हून अधिक प्रयोग केले आहेत. भारतातील तिच्या पूर्वजांच्या गावात सर्वचजण देव पाण्यात ठेवून त्यांच्या येण्याची वाट पाहत होते. ती सुखरूप परत यावी म्हणून तिच्या झुलासन या मूळ गावात यज्ञ आणि पूजा आयोजित केली होती. आज अमेरिकेतच नव्हे तर भारतातही उत्साहाचे वातावरण आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुनीता विलियम्स यांना खास पत्र पाठवून त्यांचे कौतुक केले आहे. अमेरिकेच्या भेटीदरम्यान पंतप्रधान मोदी यांनी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांच्यासोबत सुनीता विलियम्स यांच्या स्थितीबद्दल चर्चा केली होती. १.४ अब्ज भारतीय तुमच्या कर्तृत्वाचा अभिमान बाळगतात. तुमच्या जिद्दीने संपूर्ण जगाला प्रेरणा मिळाली आहे,फ्फ असे पंतप्रधान मोदी यांनी सुनीताला उद्देशून लिहिलेल्या पत्रात नमूद केले आहे. तसेच, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बायडेन प्रशासनावर टीका करत हे अंतराळवीर संकटात टाकल्याचा आरोप केला. मात्र, व्हाईट हाऊसने शब्द पाळल्यामुळे या यशस्वी मिशनचे श्रेय ट्रम्प यांना दिले आहे. आता सुनीताची घरवापसी झाली आहे. तिला तिच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी वेळ द्यायला हवा. दीर्घकाळ अंतराळात राहिल्याने सुनीता विलियम्स आणि बुच विल्मोर यांना अनेक आरोग्यविषयक आव्हानांचा सामना करावा लागणार आहे. अवकाशामधील गुरुत्वाकर्षणाचा अभाव, हाडांची घनता कमी होणे, स्नायू कमकुवत होणे, तसेच रेडिएशनमुळे दृष्टीवर परिणाम होऊ शकतो. तसेच जास्त काळ अवकाशात राहिल्याने त्यांच्या शरीरावर अनेक बदल देखील दिसून येऊ शकतात. पृथ्वीवर परतल्यानंतर अंतराळवीरांना उभे राहणे आणि चालणे कठीण होऊ शकते. त्यामुळे, सुनीता आणि त्यांच्या टीमला चांगले आरोग्य लाभो ही प्रार्थना करूया.

# सीबीएसईचे स्वागत; पण नियोजन उत्तम हवे!

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, सीबीएसई, आयसीएसई बोर्ड अशा विविध स्वरूपात प्ले ग्रुप, नर्सरी, ज्युनिअर केजीपासून दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यात येत आहे. महाराष्ट्राच्या शहरी आणि ग्रामीण भागात सर्वाधिक शिक्षण हे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या माध्यमातूनच देण्यात येत आहे. दहावीच्या बोर्ड परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थी संख्येवरून त्याचा अंदाज येतो. त्यांची संख्या व तुलनेने सीबीएसई, आयसीएसई बोर्डाची परीक्षा देणाऱ्या दहावीच्या विद्यार्थ्यांची संख्या पाहिल्यावर आपणास त्याचा अंदाज बांधणे शक्य होते. गरिबांपासून ते सर्वसामान्यांपर्यंतची मुले ही महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या माध्यमातूनच शिक्षण घेत असतात. समाजातील नवश्रीमतांचा वर्ग, मध्यम वर्गीय, उच्च उत्पन्न गटातील लोकं आपल्या पाल्यांना सीबीएसई, आयसीएसई बोर्डाच्या माध्यमातून शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाच्या शाळेत विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यास प्राधान्य देत असतात. शिक्षण हे शिक्षण असते. त्यात कोणत्याही प्रकारचा दुजाभाव करता येणार नाही; परंतु शिक्षण शिकविण्याची पद्धती, त्या शिक्षणाचा दर्जा पाहिल्यावर तफावत दिसून येते. ही तफावत दहावीचा निकाल लागल्यावर अकरावी प्रवेशापासून पाहावयास मिळते. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातून दहावी उत्तीर्ण झालेली मुले व सीबीएसई, आयसीएसई बोर्डाच्या माध्यमातून दहावी उत्तीर्ण झालेली मुले यांच्यातील आत्मविश्वास, वावरण्यातील सहजता, इंग्रजी भाषेवरील प्राबल्य या गोष्टींतील विरोधाभास ठळकपणे पाहावयास मिळतात. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातून दहावी उत्तीर्ण झालेल्या मुलांना कॉलेजातील वातावरणात समरस व्हायला सहा ते सात महिन्यांचा कालावधी जातो. ही अडचण सीबीएसई, आयसीएसई बोर्डातून उत्तीर्ण झालेल्या मुलांना जाणवत नाही. सीबीएसईकडे समाजातील पालकांचा कल वाढत आहे. आपले बाळ जन्माला आल्यावरच त्या मुलांना सीबीएसईच्या शाळेतच प्रवेश द्यायचा, ही खूणगाठ पालकांनी मनाशी बांधलेली असते. एक तर आधीच इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मुलांना शिक्षण देण्याची पालकांची आग्रही भूमिका आणि त्या माध्यमातून शिक्षण देणे ही प्रतिष्ठेची बाब मानली जात असल्याने राज्यातील शहरी आणि ग्रामीण भागातील मराठी शाळांना गेल्या काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर ङ्गटाळेफ लागत आहे. मराठी माध्यमातील शिक्षकांना गेल्या काही वर्षांपासून ङ्गसरप्लसफ्च्या समस्येचा सामना करावा लागत आहे. सीबीएसई अभ्यासक्रम आता राज्यातील जिल्हा परिषदेसह इतर शासकीय शाळांमध्ये शिकविला जाणार आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून २०२५-२०२६ मध्ये सीबीएसई अभ्यासक्रमाचा समावेश केला जाणार आहे. राज्यातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी म्हणून सरकारने हा निर्णय घेतला आहे, अशी माहिती राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी विधान परिषदेमध्ये दिली. राज्याच्या अभ्यासक्रम आराखड्याला शालेय शिक्षण विभागाशी संबंधित सुकाणू समितीने मान्यता देण्यात आली आहे. सीबीएसई अंतर्गत पाठ्यपुस्तके मराठीमध्ये उपलब्ध करून दिली जाणार आहेत. १ एप्रिलपासून सत्राची सुरुवात करण्यात येणार आहे. विधान भवनातील अधिवेशनादरम्यान राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी गुरुवारी (२० मार्च) विधान परिषदेमध्ये या संदर्भात घोषणा करतात काय आणि अवघ्या ११ दिवसांतच या सीबीएसई अभ्यासक्रमाच्या सत्राची सुरुवात होणार आहे. हा प्रकार म्हणजे ङ्गपी हळद आणि हो गोरीफ अशातला प्रकार आहे. राज्यातील जिल्हा परिषदेसह अन्य सरकारी शाळांतून सीबीएसई अभ्यासक्रमातून शिक्षण देण्याचा प्रयत्न नक्कीच स्तुत्य आहे. याची यापूर्वीच अंमलबजावणी होणे आवश्यक होते. घोषणा करून अवघ्या ११ दिवसांमध्ये अंमलबजावणी करणे हा सर्व प्रकार आकलनापलीकडचा आहे. राज्यातील जिल्हा परिषद, महानगरपालिका व अन्य शासकीय प्राधिकरणाच्या शाळांमध्ये आधीच इंग्रजीची बोंब आहे. सीबीएसईच्या शाळांमधील शिक्षक वर्ग हा सुरुवातीपासूनच प्रशिक्षित असतो. त्या शिक्षकांचे इंग्रजी भाषेवर प्रभुत्व आहे. त्या शाळांमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या घरचे वातावरण सुरुवातीपासून इंग्रजाळलेले असते. आई-वडिलांपैकी कोणा तरी एकाचे इंग्रजी चांगले असते. जिल्हा परिषद तसेच महापालिकेच्या शाळांमध्ये शिक्षकांपासून ते विद्यार्थ्यांच्या घरापर्यंत सर्वत्रच बोंब आहे. जिल्हा परिषद व महापालिकेच्या शाळांतील ठरावीक शिक्षकांचा अपवाद वगळता उर्वरित सर्वच शिक्षकांमध्येच इंग्रजीबाबत फारशी रुची व त्यावर प्राबल्य नसेल, तर ते मुलांना काय शिक्षण देणार? याचाही कोठेतरी विचार होणे आवश्यक आहे. जिल्हा परिषदेतील शाळांमध्ये शिक्षण घेणारी मुले ही शेतकरी परिवारातील असतात. महापालिका शाळेतील मुले ही गरीब वर्गातील तसेच अत्यल्प उत्पन्न गटातील मुले असतात. शेतकऱ्यांना शेतातून व शहरातील कष्टकऱ्यांना पोटासाठी दिवसभर संघर्ष करण्यातून वेळ मिळत नाही. ते कोठे मुलांच्या सीबीएसई अभ्यासक्रमाबाबत जागरूकता दाखवणार, मुलांकडे कितपत सीबीएसईच्या अभ्यासक्रमाबाबत आस्थेवाईकपणे चौकशी करणार, याबाबतही प्रश्नचिन्हच आहे. याशिवाय सीबीएसईचा अभ्यासक्रम सुरू करावयाचा म्हटल्यावर सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या पुस्तकांचे काय करायचे? पुस्तके छापणाऱ्या बालभारतीच्या आस्थापनेचे काय? त्या कर्मचाऱ्यांचे पुढे काय भवितव्य? जिल्हा परिषदेच्या तसेच महापालिकेच्या शिक्षकांची सीबीएसई अभ्यासक्रमाबाबत तयारी कधी करून घेणार? याबाबत अस्पष्टता कायम आहे. सीबीएसईच्या नियोजनाची गरज आहे. अनियोजनामुळे, ढिसाळ कारभारामुळे चांगल्या संकल्पनेला अपयश येऊ नये हेच यानिमित्ताने प्रकर्षाने जाणवत आहे.

## पवनचक्की कंपन्यांनी शेतकऱ्यांना मावेजापोटी दिलेले धनादेश वठलेच नाहीत ; बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील प्रकार ; जिल्हा प्रशासनाची भूमिका म्हणजे कुंपनच शेत खातंय :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:- ( दि.२३ ) बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील रिन्यु ग्रीन पवनचक्की कंपनीने शेतकऱ्यांना मावेजा पोटी दिलेले धनादेश वठले नसल्याने व विचारणा केल्यानंतर आधिकारी उडवाउडवीची उत्तरे देत टाळाटाळ करत असल्याने शेतकऱ्यांनी तिव्र नाराजी व्यक्त केली आहे. बीड तालुक्यातील बालाघाटावरील पवनचक्की कंपन्यांचा मनमानी कारभार सुरूच असुन जिह्ला प्रशासन आणि पोलीस प्रशासनाची भूमिका शेतकऱ्यांना न्याय भुमिकेतुन संरक्षण देण्याऐवजी पवनचक्की कंपन्यांची पाठराखण करण्याची असुन कुंपनच शेत खात असेल तर दाद कोणाकडे मागायची अशी संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली आहे. सविस्तर माहितीस्तव बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील शेतजमिनीत रिन्यु ग्रीन एम.एच.पी.वन.प्रायव्हेट लिमिटेड नवी दिल्ली या कंपनीने पवनचक्की उभारली आहे. पवनचक्कीची उभारणी करताना काही क्षेत्र पवनचक्की भागात आणि काही क्षेत्र रस्ता शेतातुन गेल्याने पवनचक्की कंपन्यांच्या आधिका-यांनी पंजाब नॅशनल बँकेचे धनादेश खाते क्रमांक ७८३५००२१०००२८६४ वरून शेतकरी अंबादास रामकिसन ढास यांना १,४९,८१३ रूपये चेक नंबर ५२३५२८ , शेतकरी सुभाष रामकिसन ढास यांना १,३८,०६३ चेक नंबर ५२३५२९ आणि शेतकरी शेषेराव रामकिसन ढास यांना १,३८,०६२ रूपये चेक नंबर ५२३५३० अशी एकुण रक्कम ४,२५,९३८ रुपये किंमतीचे धनादेश वठलेच नाहीत. संबंधित प्रकरणात पवनचक्की कंपन्यांच्या आधिका-यांना विचारणा केली असता अगोदर उडवाउडवीची उत्तरे दिली असुन आता फोन घेण्यास सुद्धा टाळाटाळ करत असल्याची तक्रार अंबादास ढास यांनी केली आहे.




उभ्या ज्वारीच्या पिकातुन गाड्या घातल्या कडब्याचे नुकसान झाले त्याचीही भरपाई अद्याप दिलीच नाही :- संदिप ढास

महिनाभरापूर्वी आमच्या शेतातील ज्वारीच्या उभ्या पिकातुन सहमतीशिवाय पवनचक्की प्रकल्प उभारण्यासाठी पोकलेन, जेसीबी,पिक अप अशा विविध वाहनांची वाहतूक केली. तेव्हा तुम्हाला नुकसान भरपाई देण्यात येईल असे सांगितले. परंतु पवनचक्की प्रकल्प उभारल्यानंतर अद्याप नुकसान भरपाई दिलीच नाही.जवळपास ८०० कडबा आणि ज्वारीची कणसे धुळीमुळे खराब झाली आहेत. अगोदर दिवसातुन ४-५ वेळा मनधरणी करण्यासाठी येणारे अधिकारी आता फोन सुद्धा उचलत नाहीत.या प्रकरणी ऊद्या सोमवारी जिह्लाधिकारी बीड व पोलीस अधीक्षक बीड यांना लेखी तक्रार करणार असल्याचे संदिप ढास यांनी सांगितले.

जिह्ला प्रशासनाची भुमिका म्हणजे कुंपनच शेत खातंय ; पवनचक्की कंपन्यांची पाठराखण तर पिडीत शेतकऱ्यांना वालीच नाही :- डॉ.गणेश ढवळे

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ऊर्जा आणि कामगार विभागाने दि.२१ आक्टोबर २०२३ रोजी पवन ऊर्जा प्रकल्प जिह्लास्तरीय व तालुकास्तरीय संनियंत्रण समित्यांची स्थापना केली असुन पवन ऊर्जा प्रकल्पाशी निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहाराबाबत कायदेशीर बाबी व अनिश्चितता तपासणे, जमिनीच्या व्यवहारांमध्ये योग्य व्यावहारिक मोबदला मिळत असल्याबाबत खात्री करणे. पवन ऊर्जा प्रकल्पाबाबत समितीकडे आलेल्या तक्रारींची चौकशी करून त्यावर योग्य कारवाई करणे.शेतकरी आणि ग्रामस्थ आणि प्रकल्प विकासक यांच्यामध्ये समन्वय ठेवणे आदि त्यांची कामे असुन जिह्लाधिकारी समितीचे अध्यक्ष तर पोलिस अधीक्षक सदस्य आहेत.मात्र या समित्या केवळ कागदावर कार्यरत असुन जिह्लाधिकारी आणि पोलिस अधीक्षक केवळ पवनचक्की कंपन्यांचीच पाठराखण करत असुन पिडीत शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले असुन जिह्ला प्रशासनाची भूमिका कुंपनच शेत खातंय अशी झाल्याची संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केली आहे.

# मराठी पत्रकार परिषदेच्या जिल्हा उपाध्यक्षपदी सचिन पवार यांची निवड

### उत्कृष्ट लेखणी, उत्कृष्ट वकृत्व आणि उत्कृष्ट संघटनच्या बळावर निवड

पाटोदा | प्रतिनिधी

बीड जिह्ला मराठी पत्रकार परिषदेच्या नव्या कार्यकारिणीची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. या निवड प्रक्रियेत सचिन पवार यांची जिह्ला उपाध्यक्षपदी निवड झाली असून, त्यांच्या नियुक्तीचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे. मराठी पत्रकार परिषदेच्या जिह्ला कार्यकारिणीमध्ये पत्रकारितेतील अनुभवी आणि सक्रिय व्यक्तींना संधी देण्यात आली आहे. सचिन पवार हे पत्रकारितेतील एक अनुभवी आणि पत्रकारांच्या कार्यात नेहमीच सक्रिय सहभाग घेणारे कार्यकर्ते असून, पत्रकारांच्या हक्कांसाठी आणि समाजातील महत्त्वाच्या मुद्द्यांवर नेहमीच त्यांचा सकस आवाज राहिला आहे.नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून पत्रकारांच्या हितासाठी प्रभावी काम करण्यात येईल, असे अपेक्षित आहे. सचिन पवार यांना जिह्ला उपाध्यक्षपद मिळाल्याबद्दल सर्व पत्रकार व संघटनेकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले असून, पुढील कार्यकाळात



त्यांच्या नेतृत्वाखाली पत्रकारांसाठी नवीन संधी आणि सुविधा उपलब्ध होतील, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

निवड उत्कृष्ट लेखणी, संघटन आणि लेखणीची!

पाटोदा तालुक्यातील पत्रकार सचिन पवार यांनी लेखणीच्या बळावर आपली वेगळीच ओळख निर्माण केली आहे. मराठी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून त्यांनी पाटोदा तालुक्याचे अध्यक्ष पद भूषवलं असून आता त्यांना जिल्ह्याचे उपाध्यक्ष पद मिळाल आहे. उत्कृष्ट लेखणी उत्कृष्ट वकृत्व आणि उत्कृष्ट संघटन या त्रिवेणी संगम मुळे त्यांना परिषदेने जिह्ला उपाध्यक्ष करून नवीन जबाबदारी सोपवली आहे, ती जबाबदारी सचिन पवार खंबीरपणे पार पाडतील असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

आमचे मार्गदर्शक एस एम देशमुख सर व सर्व पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार - सचिन पवार

माझी लेखणी, वकृत्व आणि संघटन या बळावर एस एम देशमुख सरांनी पाटोदा तालुक्याची जबाबदारी माझ्यावर देऊन माझ्यावर विश्वास दाखवला होता तसेच यावेळेस जिह्ला उपाध्यक्ष करून त्यांनी माझ्या जबाबदारीत अधिक भर टाकली आहे, प्रथमता एस एम देशमुख सरांचे व सर्व पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो तसेच टाकलेली जबाबदारी खंबीरपणे पार पाडेल आणि संघटनेच्या अभिमानात भर पडेल असं कार्य माझा हातून घडेल असा विश्वास पूर्ण शब्द देतो अशा भावना नवनिर्वाचित जिह्ला उपाध्यक्ष सचिन पवार यांनी व्यक्त केले आहे.

## गुंतेगाव येथे राष्ट्रीय अन्न सुरक्षा पौष्टिक तृणधान्य अंतर्गत कृषी दिन साजरा



गेवराई : प्रतिनिधी

पीक उत्पादनावरील वाढता खर्च कमी करण्यासाठी व किडीची वाढती रोगप्रतिबंधक क्षमता रोखण्यासाठी एकात्मिक पद्धतीनेच किड नियंत्रण होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन कृषी विज्ञान केंद्र खामगाव येथील कीटक शास्त्रज्ञ डॉ.बी.बी गायकवाड यांनी केले. मंडळ कृषी अधिकारी कार्यालय उमापुर आयोजित गुंतेगाव येथील कृषी दिन कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच विलास वाघमोडे, प्रमुख पाहुणे म्हणून जय भवानी सहकारी साखर कारखाना शिवाजीनगर चे संचालक नंदकिशोर गोरडे, अंबड तालुक्यातील उसाचे एकरी 90 टन उत्पादन घेणारे युवा कृषी पदवीधर शेतकरी सावता काळे, कृषी तंत्रज्ञान प्रसारक बाबू येवले, मंडळ कृषी अधिकारी काकासाहेब पंडित, कृषी पर्यवेक्षक किशोर पठाडे हे उपस्थित होते. प्रभावी किड एकात्मिक नियंत्रणासाठी खोल नांगरट, पक्षी थांबे, पिवळे निळे चिकट सापळे , प्रकाश सापळे, निंबोळी अर्काचा वापर करावा असे श्री गायकवाड यांनी यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक मंडळ कृषी अधिकारी काकासाहेब पंडित यांनी केले पीक उत्पादनामध्ये जमिनीच्या मगदूराप्रमाणे वाणाची निवड करून पिकाच्या संवेदनशील अवस्थेत संतुलित पाण्याचा व संतुलित खताचा वापर केल्यास अपेक्षित उत्पादन घेता येते असे सांगितले. प्रगतशील युवा शेतकरी श्री काळे यांनी उसाचे एकरी 90 टन उत्पादन तंत्रज्ञान मध्ये बेणे निवड, बेणे प्रक्रिया, संजीवकाचा कार्यक्षम वापर व स्वतः चा अनुभव विशद केला.

बापू येवले यांनी बीज प्रक्रिया विद्राव्य खताचा उत्पादन वाढीमध्ये सहभाग याविषयी उपयुक्त माहिती सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषी सहाय्यक मेघराज नाटकर तर आभार प्रदर्शन महावीर मैन्द यांनी केले या कार्यक्रमाप्रसंगी योगेश गोरडे, बंडू गोरडे, बदाम गोरडे ,किरण येवले, अशोक जाधव रवी खोसे पंचक्रोशीतील बहुसंख्य शेतकरी व कृषी सहाय्यक शांतीलाल करंडे, नचिकेत जोशी, योगेश सुरदुसे, संदीप महाडिक,प्रदीप मुने, वैष्णवी आरे उपस्थित होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार २४ मार्च २०२५
https://lokaarambh.com



# तर बीडचे मणिपूर होईल खा.रजनी पाटील यांचा सरकारवर हल्लाबोल



केज । प्रतिनिधी राज्यसभेत काँग्रेस नेत्या रजनी पाटील यांनी बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येवरून राज्य आणि केंद्र सरकारवर हल्लाबोल केला. त्यांनी काश्मीरमधील स्थिति विषयी आणि गृह मंत्रालयाच्या असमाधानकारक कामगिरीवर देखील तीव्र शब्दात टीका केली व सरकारला धारेवर धरले. मबीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या क्रू र हत्येने राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचे अपयश पुन्हा उघड झाले. वेळीच आरोपींवर कारवाई झाली नाही, तर बीड जिल्हा आणि महाराष्ट्राचे मणिपूर होण्यास वेळ लागणार नाही, असे एका स्थानिक शेतकऱ्याने काँग्रेसच्या सद्भावना यात्रेवेळी सांगितले,फ असा अनुभव सांगताना काँग्रेस नेत्या रजनी पाटील यांनी शुक्रवारी केंद्र व राज्य सरकारवर हल्लाबोल केला. राज्यसभेत मराठीतून केलेल्या १० मिनिटांच्या भाषणात पाटील यांनी विविध मुद्द्यांवरून केंद्रावर टीकास्त्र सोडले. जम्मू आणि काश्मीरमधील परिस्थिती सामान्य होत असल्याचे केंद्र सरकार वारंवार सांगत आहे. मग काश्मीरमधील सुरक्षेसाठी यंदाच्या ४१ हजार कोटी रुपयांची मोठी तरतूद का करावी लागली? मोदी सरकारने काश्मिरी पंडितांचा वापर केवळ राजकीय शस्त्र म्हणून केला आहे. त्यांना मदत न करता त्यांच्यावर चित्रपट बनवण्याचे आणि त्याबद्दल फक्त बोलण्याचे काम त्यांनी केले आहे,

## छेड काढणारे आरोपी सोडून पीडितांवरच खाकीगिरी

बीड । प्रतिनिधी घरभेटी देणाऱ्या विद्यार्थिनीची दोन टवाळखोरांन छेड काढली. त्यांच्याविरोधात तक्रार देण्यासाठी मुलींसह प्राचार्या बीड शहर पोलिस ठाण्यात गेल्या. परंतू येथील पोलिस उपनिरीक्षकांनी पीडितांवरच खाकोगिरी दाखवली एवढेच नव्हे तर त्यांना आधार देण्याएवेजी भिती दाखविण्याचाही प्रयत्न केल्याची माहिती आहे टवाळखोर दोघांविरोधात गुन्हाही दाखल झाला.जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरात यांच्याशी बोलताना या अधिकाऱ्यांचा मतोराफ कायम होता. शनिवारी दुपारी १२ वाजेच्या सुमारास हा प्रकार घडला. बीड शहरात घरभेटी देण्याचे काम नर्सिंगच्या विद्यार्थीनी करत असतात. शनिवारी सकाळीही सहा जणींचा ग्रुप धांडे गल्लीत गेला. तेथे दुचाकीवरून आलेल्या दोन टवाळखोरांनी या मुलींना अडवून चिठ्ठी दिली. त्यात मोबाईल क्रमांक होता. घाबरलेल्या मुलींना पुन्हा दुसऱ्या ठिकाणी अडवले. यात इतर लोकांनी एका पकडले तर दुसरा पळून गेला. या प्रकरणात पीडित मुलीच्या तक्रारीवरून बीड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकारामुळे मुलींमध्ये भितीचे वातावरण आहे. पोलिसांकडून मुलींना भिती दाखविण्यासह तक्रार घेण्यास टाळाटाळ होत असल्याचे समजताच जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरात हे शस्त्रक्रिया गृहातून तातडीने पोलिस ठाण्यात दाखल झाले. त्यांनाही या सर्व प्रकारचा अनुभव आला.

## झाडे लावा झाडे जगवा चा आदर्श पालकांनीही घेतला

## मुलाच्या वाढदिवसानिमित्त सादोळा जि प शाळेला केशर आंब्याच्या तीन रोपांची दिली भेट

माजलगाव प्रतिनिधी ..तालुक्यातील सादोळा येथील जनतेने व मुलांच्या पालकांनी चांगलाच आदर्श घेतला असून आपल्या मुलाच्या वाढदिवसानिमित्त सादोळा येथील एका विद्यार्थ्याच्या पालकांनी तीन केशर आंब्याची रोप शाळेला भेट देऊन आपल्या पाल्याचा वाढदिवस साजरा केला सादोळा येथील शिक्षण प्रेमी गौतमराव सोळंके यांनी आपल्या मुलाचा वाढदिवस मोठ्या थाटामाटात साजरा करण्याचा संकल्प केला मात्र इतरत्र खर्च करण्यापेक्षा शंभूराजे गौतमराव सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त सादोळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत जाऊन मुख्याध्यापक यांचेकडे तीन केशर आंब्याची रोप दिले



यातून केशर आंब्याची रोप जगवा आणि सर्वांमध्ये गोडवा वाढवा असा संदेश चिरंजीव शंभूराजे सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त देण्यात आल्याने शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष श्रीराम प्रसाद सोळंके श्री सुरज देशमुख श्री अशोक पोपळे यांच्यासह सर्व शिक्षक वर्ग अशा गावकऱ्यांनी गौतमराव सोळंके यांचे कौतुक केले हॉटेलवर जाऊन केकची नाच करून हजारो रुपये खर्च करून वाढदिवस साजरा करण्यापेक्षा झाडे जगवा झाडे वाढवा आणि गोड केशर आंब्याच्या माध्यमातून गोडवा वाढवा असा संदेश ची. शंभुराजे गौतमराव सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त मिळाल्यामुळे तो निश्चितच आदर्शवत ठरेल यात तिळमात्र शंका नाही

## माऊली गिरीच्या मारेकऱ्यांना कडक शासन करा-दादासाहेब गिरी




धाराशिव जिल्ह्यातील भुम तालुक्यातील दुधोडी गावातील माऊली बाबासाहेब गिरी या युवकांची प्रेम प्रकरणातील संशयावरून दि.३ मार्च रोजी अमानुष हात्या करण्यात आली आहे यांचा सर्व समाजाच्या वतिने जाहीर निषेध व्यक्त होत असून माऊली गिरीच्या मारेक-यांना अटक करून फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी बीड जिल्हा शिववंशिय दसनाम गोसावी समाज संस्थेच्या वतिने दादासाहेब गिरी, गंगाधर पुरी, संतोष भारती,अनिल गिरी,अंबादास गिरी, दत्ता गिरी, विनायक गिरी,नाना पर्वत, गोरख पुरी,गोकुळ गिरी,श्रीराम गिरी, नारायण गिरी,राम भारती,लहू पुरी,राजेंद्र गिरी,सतीश बन, प्रल्हाद गिरी,भारत गिरी,अमर पुरी,ओम गिरी,आदिनी प्रशासनाकडे केली आहे. धाराशिव जिल्ह्यातील भुम तालुक्यातील दुधोडी येथील माऊली बाबासाहेब गिरी यांची प्रेम प्रकरणातील संशयावरून अमानुष हात्या करण्यात आली या घटनेने महाराष्ट्रात हाळहाळ व्यक्त होत आहे तर महाराष्ट्रातील दसनाम गोसावी समाजांच्या वतिने ठिकठिकाणी निषेधार्थ उपोषण धरणे आंदोलन करण्यात येत असून जनतेत संताप व्यक्त होत आहे धाराशिव जिल्ह्यातील भुम तालुक्यातील दुधोडी येथील माऊली गिरी यांना न्या मिळावा म्हणून लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मानवी हक्क अभियानच्या युवक तालुका संघटकपदि युवा नेते विनोद गायकवाड यांची निवड

### मानवी हक्क अभियान संघटनेकडे युवकांचा मोठा कल

माजलगाव / प्रतिनिधी :- शहरापासून अवघ्या दोन ते तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या फुले पिंपळगाव येथील आंबेडकर चळवळीतील युवा कार्यकर्ते विनोद भैया गायकवाड यांची मानवी हक्क अभियान संघटनेच्या युवक तालुका संघटक पदी निवड करण्यात आली. मानवी हक्क अभियानचे अध्यक्ष प्रा.डॉ. मिलिंद नाना आव्हाड यांच्या यांच्या आदेशाने मानवी हक्क अभियानाच्या युवक तालुका संघटकपदी विनोद भैय्या गायकवाड यांना निवडीचे पत्र देण्यात आले. यावेळी मानवी हक्क अभियानचे तालुका अध्यक्ष



मधुकर कांबळे, वडवणी तालुका अध्यक्ष विष्णू बप्पा मुजमुले, धारूर तालुकाध्यक्ष किसन भाऊ लोखंडे, तालुका कार्याध्यक्ष बाबासाहेब थोरात, तालुका सचिव कपिल आडगळे, युवक नेते रमेश जाधव ज्येष्ठ नेते रमेश गवळी,प्रह्लाद दळवी, शहराध्यक्ष संदीप वाघमारे , बबन खंडागळे, पत्रकार आनंत घडसिंगे, पत्रकार मच्छिंद्र उफाडे , पत्रकार सुनील थोरात,अंजन कांबळे , अशोक लोंढे, सुंदर भिसे,भारत जाधव ,सौरभ गायकवाड,प्रदीप खंडागळे, अनिकेत वाघमारे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## जातीय तेढ निर्माण करणाऱ्यावर कठोर कारवाई -ना.अजित पवार

मु ंबई । प्रतिनिधी राज्यात गेल्या काही दिवसांपासून औरंगजेबाची कबर आणि नागपूर हिंसाचारामुळे तणावाचे वातावरण आहेत. राज्यात दोन गटात तणावाची पार्श्वभूमी असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे इफ्तार पार्टीचे आयोजन करत मुस्लीम समुदायाशी संवाद साधला. मुस्लीम समुदायाला धमकी देण्याचा किंवा जातीय तेढ करण्याचा प्रयत्न केला तर अशा लोकांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा अजित पवार यांनी यावेळी दिला. दरम्यान, अजित पवार यांच्या इशाऱ्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही यावर प्रतिक्रिया दिली आहे. फडणवीस यांनीही चांगले काम करणाऱ्या आणि देशभक्त व्यक्तीला कोणी त्रास दिला तर त्याला सोडणार नसल्याचे म्हटले आहे.मु ंबईत आयोजित केलेल्या इफ्तार पार्टीत मुस्लीम समुदायाला रमजानच्या शुभेच्छा देत असताना अजित पवार म्हणाले, भारत हा विविधतेत एकतेचे प्रतिक असलेला देश आहे. विभाजनवादी शक्तींच्या जाळ्यात कुणीही अडकू नये.ते पुढे म्हणाले की, तुमचा बंधू म्हणून मी तुमच्या पाठिशी उभा आहे. जर कुणी मुस्लीम बांधव आणि भगिनींना त्रास देण्याचा किंवा त्यांच्याकडे डोळे वटारून पाहण्याचा प्रयत्न केला तर त्याला सोडणार नाही.यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आमच्या मुस्लिम बांधवांकडे डोळे वटारणाऱ्याला सोडणार नाही या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली.

## सख्ख्या मावस भावानेच तेरा वर्षाच्या अल्पवयीन मावस बहिणीला पळवून नेले

केज : मावशी व काका हे नातेवाईकांच्या अंत्यविधीसाठी बाहेरगावी गेल्याची संधी साधून चक्क नात्याने सख्खा मावस भाऊ असलेल्या नराधमाने त्याच्या तेरा वर्षाच्या मावस बहिणीला फुस लावून पळवून नेले आहे. केज तालुक्यातील कोरेगाव एका वस्तीवर आई -वडिलां सोबत राहत अस- लेल्या लक्ष्मी मोतीराम पवार या तेरा वर्ष वयाच्या अल्पवयीन मुलीचे आई-वडील हे दि. २० मार्च रोजी सायंकाळी ५:३० वा. च्या सुमारास नातेवाईकांच्या अंत्यविधीस- ाठी बाहेरगावी गेले होते. ही संधी साधून त्या अल्पवयीन मुलीचा मावसभाऊ गं- गाराम अरुण पवार रा. एकुरका ह. मु. पानगाव ता. कळंब जि. धाराशिव त्यांच्या घरी आला. त्याने दि. २१ मार्च रोजी मध्यरात्री २:३० वा. च्या सुमारास चहा प्यायला म्हणून अल्पवयीन मावस बहिणीला त्याने आणलेल्या गाडीत घेवून गेला. मात्र तो परत घरी आला नाही. मुलीच्या नातेवाईकांनी दोघांचा शोध घेतला मात्र ते आढळून आले नाहीत. म्हणून दि. २१ मार्च रोजी मुलीची आई ताई मोतीराम पवार रा. कोरेगाव ता. केज हिच्या तक्रारी वरून अल्पवयीन मावस बहिणीला अज्ञात कारणासाठी पळवून नेले म्हणून मुलीचा मावसभाऊ गंगाराम पवार याच्या विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गु. र. नं. ११३/२०२५ भा. न्या. सं. १३७(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याचा तपास पो- लीस उपनिरीक्षक शैलेश जोगदंड हे करीत आहेत.



माजलगांव प्रतिनिधी शिफा सय्यद समीर राहणार इदगाह मोहल्ला माजलगाव या चिमूकलिने आपल्या वयाच्या ८व्या वर्षी आयुष्यातील पहिला उपवास ठेवल्याने कुटुंबातील सर्व सदसस्यानी व नातेवाईकाने सुभेच्छा दिल्या.


## माजलगाव तालुक्यात पीएम घरकुलाच्या नावाखाली ग्रामसेवक सह सरपंच करु लागले जनतेची लूट बी डी ओ त्यांना देऊ लागलेसूट

### जीवने साहेब गोरगरिबांच्या ही आर्थिक लुट थांबवा आम्ही गाऱ्हाणं मांडायचं कोणाकडे?

माजलगाव (प्रतिनिधी ) गोरगरीब जनतेला निवारा मीळावा कोणीही बेघर राहू नये म्हणून केंद्राच्या पंतप्रधान कार्यालयाकडून पीएम आवास योजना राबवण्यात आली खेड्यापाड्यातील गोरगरीब जनतेने आपल्याला घर मिळावा म्हणून सरपंच ग्रामसेवक यांच्याकडे याचना केली मात्र याचा गैरफायदा घेत माजलगाव तालुक्यातील सरपंच साहेब ग्रामसेवक घरकुल पाहिजे असेल तर पाच किंवा दहा हजार रुपयांचे मागणी करत आहेत मोल मजुरी करणारे लोक यांच्याकडे एवढे पैसे असते तर तुमचे घरकुल मागायला तरी आले असते का? जीवणे साहेब तुम्ही प्रत्येक गोष्टीचा पुरावा मागता किंवा जीमेदारी झटकून मोकळे हौतात मात्र कोट्यावधी रुपये खर्चून निर्माण केलेलं जिल्हा परिषद प्रशासन काय कामाचं? ही फक्त आम्ही माजलगाव तालुक्याची व्यथा मांडत आहोत जिल्हाभरात हीच परिस्थिती चालू आहे याबाबत कोणीही आवाज उठवत नाही जिल्हाभरातील सरपंच आणि ग्रामसेवक तुम्हाला घरकुल पाहिजे असेल तर आम्ही मागतो ती रक्कम तुम्हाला द्यावीच लागेल असे सांगतात आणि मंजूर घरकुलचे हफ्ते मिळविण्या साठी तुमचे इंजिनियर प्रत्येक हप्ता 2000रु मागतात अशे 50,000हजाराच्या पुढे जातात आणि हे सर्व लोक म्हणतात हे पैसे आमच्या एकट्यासाठी नसतात तर वरपर्यंत आम्हाला पैसे द्यावे लागतात असे असे सांगतात हे किती खरं आणि किती खोटं हे सर्वसामान्य जनतेला माहीत नाही मात्र याबाबत जिल्हाभरात प्रत्येक पंचायत समितीला जीवणे साहेबांनी जर कडक सूचना दिल्या बीडिओ यांचे कान पिळले तर जनतेची होणारी लूट निश्चितच थांबेल आणि हे झाले नाही तर भ्रष्ट प्रशासनाची इथून तिथून साखळी असते हा संदेश जनतेत जाईल आणि याचे अत्यंत वाईट परिणाम जिल्हा परिषद प्रशासनाला भोगावे लागतील हे मात्र निश्चित त्यामुळे जीवने साहेब जातीने लक्ष घाला आम्ही तुम्हाला तरुण तडफदार आणि इमानदार अधिकारी समजत आहोत आमचा हा गैरसमज ठरू नये एवढीच अपेक्षा

## कै. अण्णासाहेब पाटील यांनी माथाडी कामगारांच्या न्याय हक्कासाठी जीवन समर्पित केले तर भगतसिंग, राजगुरू, सुखदेव देशासाठी शहीद झाले- रमेश पोकळे

बीड दि. 23(प्रतिनिधी) महाराष्ट्रातील असंघटित कामगारांना त्यांचे न्याय हक्क मिळवून देण्यासाठी कै. अण्णासाहेब पाटील यांनी विविध ठिकाणी विखुरलेल्या कामगारांना एकत्र करून माथाडी कामगार संघटना स्थापन केली. या संघटनेच्या माध्यमातून कामगारांच्या जीवनाला स्थैर्य मिळून देण्यासाठी माथाडी कायदा तयार करून घेतला. माथाडी कामगारांना मदत व्हावी म्हणून अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य या मूलभूत गरजांबरोबरच त्यांच्या मुलांना दर्जेदार शिक्षण मिळवून देण्यासाठी माथाडी भवन, माथाडी पतपेढी निर्माण करून माथाडी कामगारांना त्यांचे न्याय, हक्क मिळवून देण्यासाठी आपले जीवन समर्पित केले. तर शहीद भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांनी भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी शहीद झाले, असे प्रतिपादन संस्था अध्यक्ष रमेश पोकळे यांनी केले आहे. येथील वसंतराव काळे कॉलेज ऑफ जर्नालिझम अँड कम्प्युटर सायन्स बीड व संभाजीराजे कॉलेज ऑफ लायब्ररी अँड मॅनेजमेंट सायन्स बीड महाविद्यालयामध्ये शहीद दिन आणि कै. अण्णासाहेब पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी रमेश पोकळे बोलत होते. यावेळी कार्यक्रमाला श्री.बन्सी हावळे सर तावरे साहेब, संतोष फावडे सर,सचिव प्रा. गणेश




पोकळे, प्राचार्य बप्पासाहेब हावळे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना रमेश पोकळे म्हणाले की, भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक महापुरुषांनी आपले बलिदान दिले आहे. भारतीय स्वतंत्र लढ्यामध्ये शहीद भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांचे योगदान मोलाचे आहे. त्यांनी देशासाठी दिलेले बलिदान आजच्या युवकांना नवी दिशा देणारे आहे. तसेच कै. अण्णासाहेब पाटील यांनी आपले संपूर्ण जीवन सर्वसामान्य नागरिकांच्या कल्याणासाठी समर्पित केले. मराठा समाजाला आरक्षण मिळावे, खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये सवलती मिळाव्यात, शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य भाव मिळावा. यासाठी स्वतः आमदार असताना मुंबई येथे भव्य मोर्चा काढून सरकारकडे विविध मागण्या मांडल्या.परंतु तत्कालीन सरकार आपल्या मागण्या मान्य करत नसल्यामुळे त्यांनी समाजासाठी बलिदान दिले. त्यांनी समाजासाठी दिलेले बलिदान सदैव स्मरणात राहील असे पोकळे म्हणाले. या कार्यक्रमाला प्रा. रफिक सय्यद, श्री आगलावे, महेश नेवडे, दीपक जाधव, सचिन चौरे आदी उपस्थित होते.

## भाविकांच्या कारला अपघात दोन ठार सहा जखमी



बीड । प्रतिनिधी नाशिक जिल्ह्यातून संभाजीनगर मार्गे तुळजापुर येथे दर्शनासाठी जाणार्या भाविकांची भरधाव कार पुलावरील कठड्याला धडकल्याने झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू झाल्याची दुर्देवी घटना आज पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास बीड-गेवराई रोडवरील रांजणी फाटा येथे घडली. या अपघातात अन्य पाच ते सहाजण जखमी झाले असुन त्यांच्यावर जिल्हा रूग्णालयात उपचार सुरू आहेत. नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथील भाविक इको कार क्र.एम.एच.१५.एच.एम.६७१६ या गाडीतून तुळजापूर येथे दर्शनासाठी चालले होते. आज पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास बीड गेवराई रोडवरीरांजणी फाट्याजवळ चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने कार थेट पुलाच्या कठड्यावर जाऊन धडकली. या अपघातात सात ते आठ जणगंभीररित्या जखमी झाले. महामार्ग पोलीसांनी त्यांना तात्काळ बीड जिल्हारूग्णालयात उपचारासाठी दाखल केले. गंभीर जखमी झाल्याने उपचार सुरू असतांना योगेश पोपट लोणारे (वय ४० रा.सिन्नर जिल्हा नाशिक) आणि ईश्वरी लोणारे (वय ५ वर्ष) या दोघांचा मृत्यू झाला तर पुनम योगेश लोणारे(वय ३४), दत्तात्रय सोमनाथ अडवाई यांच्यासह इतर काहीजण जखमी झाले आहेत. त्यांच्यावर जिल्हा रूग्णालयात उपचार सुरू आहेत

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार २४ मार्च २०२५
https://lokaarambh.com



## सामाजीक सलोखा राखण्यासाठी शांतता कमिटीची बैठक संपन्न

बीड : आगामी काळातील सण उत्सव जसे की, गुढी पाडवा, छ. संभाजी महाराज बलीदान मास, रमजान ईद, श्रीराम नवमी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती च्या अनुषंगाने आज दिनांक २२/०३/२०२५ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय येथे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत साहेब यांच्या अध्यक्षतेखाली शांतता समितीची बैठक बोलावण्यात आली होती. सदर बैठकीस बीड शहर तसेच जिल्ह्यातील शांतता समितीचे सदस्य उपस्थीत होते. बैठकीस उपस्थीत सदस्यांना सायबर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री. देवीदास गात यांनी सोशल मिडीयावर सामाजीक सलोखा बिघडवणाऱ्या पोस्ट केल्यास त्याचा समाजावर तसेच कुटुंबावर कसा परीणाम होतो याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सध्या युवकांतर्फे सोशल मिडीयाचा गैरवापर व अतिरेक होत असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे शांतता समितीच्या सदस्यांनी स्वतः समाजातील युवकांना अवगत करुन त्यातुन निर्माण होणाऱ्या समस्यांची जाणीव करुन द्यावी. आक्षेपार्ह व्हॉट्सअप स्टेटस, रिल्स, पोस्ट करणारे किंवा प्रसारीत करणारे तसेच सोशल मिडीयावर सामाजीक बिघडवणाऱ्या पोस्ट किंवा प्रक्षोभक वक्तव्य करणाऱ्या इसमांविरुद्ध कायदेशीर कारवाई केली जाईल. कोणाचीही गय केली जाणार नाही. समाजातील जेष्ठ नागरीकांनी सामाजीक सलोखा राखण्यासाठी मार्गदर्शक होवुन शांतता राखण्यासाठी प्रयत्न करावे असे मत पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी व्यक्त केले आहे. यापुढे शांतता समितीची बैठक प्रत्येक महीन्यायाला अयोजीत केली जाणार आहे. सदर शांतता समिती बैठकीस नागरीकांनी मांडलेल्या समस्यांचे निराकरण करण्याचा बीड पोलीस दलाकडून केला जाईल असा विश्वास शांतता समितीतील सदस्यांना दिला आहे. तसेच शांतता समितीच्या बैठकीस उपस्थीत सदस्यांना संबोधीत करतांना पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत साहेब यांनी नजीकच्या काळात होळी सणा निमीत्त बीड जिल्ह्यात काही घटना घडल्या होत्या

# तुळजापुरात भोसलेसाठी आदिवासी समाजाचा रास्ता रोको

तुळजापूर / प्रतिनिधी भाजपचा पदाधिकारी आणि आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता अशी ओळख असलेला सतीश भोसले उर्फ खोक्या भाईची दहशत सोशल मीडिया वरून व्हायरल झाल्यानंतर आधी वनविभागाची कारवाई आणि नंतर १४ दिवस न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली . याचवेळी धाराशिवात मात्र,सतीश भोसले खोक्या नाही तर आमचा विठ्ठल असे म्हणत मित्रांच्या हातावर विठ्ठल नावाचे टॅटू काढलंय .सतीश भोसलेची चुकीची प्रतिमा तयार केल्याचा आरोप करत त्याच्या कुटुंबीयांच्या समर्थनार्थ आदिवासी समाज आक्रमक झाला आहे .वनविभागाकडून केलेल्या कारवाईच्या निषेधार्थ तुळजापुरात आदिवासी समाजाने रास्ता रोको केलाय .या रास्ता रोको ला दलित पँथरचा ही सक्रिय पाठिंबा आहे. वनविभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी,सतीश भोसलेचा जातीवाचक उल्लेख करणाऱ्यांवर ट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करावा तसेच सतीश भोसले यांच्या कुटुंबीयांवर दाखल करण्यात आलेले खोटे गुन्हे मागे घ्यावेत अशी मागणी या आंदोलकांनी केली आहे.राजकीय उट्टे काढण्यासाठी सतीश भोसलेला टार्गेट केल्याचा आरोपही आदिवासी समाजातून करण्यात आला आहे. शिरूरमधील दिलीप ढाकणे आणि त्यांचा मुलगा महेश ढाकणे यांना मारहाण केल्याचा व्हिडिओ समाज माध्यमावर व्हायरल झाल्याने सतीश भोसले उर्फ खोक्याची दहशत चर्चेचा विषय बनली .गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या सतीश भोसले विरोधात गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांची नोंद आहे .यात मारहाण प्राणघातक हल्ला, फसवणूक,खुनाचा गुन्हा असे वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल आहेत .काही दिवसांपूर्वीच वनविभागाच्या जागेवर दुमजली इमारत आणि त्या बाजूला आलिशान ऑफिसमधून सतीश भोसले चालवत असल्याचे लक्षात आल्यानंतर वनविभागाने सतीश भोसले उर्फ खोक्याच्या अनधिकृत घरावर तसेच ऑफिसवर बुलडोझर चालवला होता . तसेच शिरूर दिवाणी व फौजदारी न्यायालयात त्याला हजर केले असता सतीश भोसलेची रवानगी न्यायालयीन कोठडीत १४ दिवसांसाठी करण्यात आली होती . दरम्यान काही दिवसांपूर्वी सतीश भोसले चे वाढलेले घर अज्ञातांनी पेटवून दिल्याची घटना घडली होती .यात त्याच्या घरातील जीवनावश्यक वस्तू ,जनावरांचा चारा ही खाक झाला व घराचही मोठं नुकसान झालं होतं . दरम्यान सतीश भोसले च्या कुटुंबातील महिलेला मारहाण केल्याची घटनाही घडली होती .या घटनेनंतर आता धाराशिव मध्ये सतीश भोसले उर्फ खोक्याच्या कुटुंबीयांच्या समर्थनार्थ आदिवासी समाज आक्रमक झाला आहे .वनविभागाकडून सतीश भोसले च्या घरावर करण्यात आलेल्या कारवाईच्या निषेधार्थ तुळजापुरात रास्ता रोको करण्यात आलाय .वनविभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी . सतीश भोसले च्या जातीवाचक उल्लेख करणाऱ्यांवर ट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करावा अशी मागणी करण्यात येत आहे . सतीश भोसले खोक्या नाही तर आमचा विठ्ठल असल्याचे म्हटले जात आहे . त्याच्या मित्रांच्या हातावर विठ्ठल नावाचे टॅटू आहे .सतीश भोसले ची चुकीची प्रतिमा तयार केल्याचा आरोपही होतो आहे.

## शिवछत्र परिवाराच्या इफ्तार पार्टीला उत्स्फूर्त प्रतिसाद अमरसिंह पंडित, आ.विजयसिंह पंडित यांनी दिल्या मुस्लिम बांधवांना शुभेच्छा

मुस्लीम समाजाच्या पवित्र रमजान निमित्ताने माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित परिवाराच्या वतीने गेवराई येथे आयोजित केलेल्या रोजा इफ्तार पार्टीला हिंदू अणि मुस्लिम बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित, जयसिंग पंडित युवानेते पृथ्वीराज पंडित, रणवीर पंडित यांनी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या. आजच्या या इफ्तार पार्टीला मुस्लिम बांधवांसोबत हिंदु बांधवही मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्यामुळे शिवछत्र परिवाराच्या या इफ्तार पार्टीत हिंदू मुस्लिम समाजातील ऐक्य पुन्हा एकदा दिसुन आले. माजीमंत्री शिवाजीराव (दादा) पंडित कुटूंबीय व शिवछत्र परिवाराच्या वतीने सालाबादाप्रमाणे मुस्लीम समाजाच्या पवित्र रमजान निमित्ताने रोजा इफ्तार पार्टीचे



भव्य आयोजन केले होते. रमजान महिण्याच्या निमित्ताने शनिवार दि. २२ मार्च रोजी सायं. ६ : ४२ वाजता छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक भवन, नगर परिषद कॉम्लेक्स, गेवराई येथे भव्य इफ्तार पार्टीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रोजा ईफ्तार पार्टिला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित जयभवानी व जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव जयसिंह पंडित, युवानेते पृथ्वीराज पंडित, रणवीर पंडित, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, भवानी बँकेचे उपाध्यक्ष मुहम्मद अब्दुल हन्नान, मुहम्मद गौस, संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष दादासाहेब घोडके, मनोज हजारे, रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, माजी नगरसेवक राधेश्याम येवले, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दीपक तात्या आतकरे, तालुका उपाध्यक्ष दत्ताभाऊ दाभाडे, कांतासेठ नवपुते, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते एस.वाय.अन्सारी, माजी नगरसेवक सय्यद नजीबभाई, माजी उपनगराध्यक्ष शेख खाजाभाई, एजाज अत्तार, मुहम्मद आवेज शरीफ, सय्यद शफी अत्तार, ज्येष्ठ पत्रकार काझी अमान, पत्रकार अयुब बागवान, राष्ट्रवादी अल्पसंख्यांक आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष सरवरखान पठाण, तालुकाध्यक्ष अब्दुल खालेक कुरेशी, धोंडराई सर्कलचे युवानेते अजीम इनामदार, वसीम फारुकी, नवीद मशायक, शेख मोहसीन भाऊ, शेख मकसूद, बागवान समाजाचे अध्यक्ष माणिकसेठ बागवान, अब्दुल सत्तार कुरेशी, जानमोहम्मद बागवान, माजी नगरसेवक मंजूर बागवान, मोहसीन बागवान, शब्बू मशायक, काझी शौकत, गुफरान इनामदार, नईम बिल्डर, नईम बागवान, काझी शफिक काझी शकील यांच्यासह गेवराई शहर व तालुक्यातील रोजदार मुस्लिमबांधव बहुसंख्येने उपस्थित होते.

## लेखक सुरेश साळुंकेंचा गौरव



बीडचे सन्मानपत्र लेखक तथा निवेदक सुरेश साळुंकेंचा औरंगाबादच्या उपजिल्हाधिकारी मा.सौ अंजलीताई धानोरकरांच्या शुभहस्ते सन्मानपत्र लेखन आणि स्वातंत्र्य सेनानी रामरावजी आवरगावकर विधी महाविद्यालयाच्यावतीने उत्कृष्ट निवेदक पुरस्कार मिळा ल्याबद्दल सत्कार करण्यात आला.महाराष्ट्र राज्य नाभिक महामंडळ जिल्हा बीडच्यावतीने जागतिक महिला दिनाच्यानिमित्ताने नितिन क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनात नारी शक्तीचा सन्मान करण्याच्या उद्देशाने नाभिक सखी सन्मान पुरस्कारांतर्गत विविध पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन केले होते.यातील पुरस्कार प्राप्त सत्कार मूर्तींचे समाजावर प्रभाव टाकणारे कार्य नेटक्या आणि श्रवणीय शब्दात सन्मानपत्रात चित्रित केल्याबद्दल आणि स्वातंत्र्य सेनानी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालयाच्यावतीने उत्कृष्ट निवेदक पुरस्कार मिळाल्याबद्दल सन्मानपत्र लेखक निवेदक सुरेश साळुंकेंचा कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या तथा औरंगाबाद च्या उपजिल्हाधिकारी मा.सौ.अंजलीताई धानोरकरांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला

## समाज पुढे घेऊन जायचा असेल तर मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणा: योगेश्वरी गडदे



बीड जिल्ह्यात मोठया प्रमाणात धनगर समाजाची संख्या आहे. या समाजात मुला मुलींना मोठया प्रमाणात शिक्षणापासून वंचित ठेवलं जात आहे. पालकांनी मुलींच्या शिक्षणावर खर्च केला तर ह्याच मुली चांगल्या पदावर जाऊन आई बाप समाजच व गावच नाव मोठया प्रमाणात रोशन करतील.लहानपणापासूनच मुलींना उच्च दर्जाचं शिक्षण देऊन त्यांना प्रवाहात आणलं पाहिजेत. आपल्या आजच्या मुली राष्ट्राच्या संपत्ती पाहून त्यांना चांगल शिक्षण दिलं पाहिजे. मोठा खर्च पालकांनी शिक्षणावर केला पाहिजे. अन्यथा समाज पुढे जाणार नाही. मुलगी शिकली तर प्रगती होईल. मोठया प्रमाणात समाज डोंगर दर्यामध्ये राहत असल्यामुळे शिक्षणाची अडचण येते.राज्य शासनाने डोंगराळ भागात शाळा काढल्या तर समाजातील मुलींना चांगल शिक्षण स्वस्त व दर्जेदार मिळेल.

# बीडमध्ये अजित पवार घेणार रात्रीतून बैठक! बीडमध्ये अजित पवार घेणार

बीड : जिल्ह्याचे पालकमंत्रीपद सांभाळल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार दोन महिन्यांनी दुसऱ्यांदा बीडमध्ये येणार आहेत. दोन एप्रिल रोजी संध्याकाळी ते अधिकाऱ्यांच्या बैठका घेणार आहेत. यापूर्वी श्री. पवार यांनी ३० जानेवारीला जिल्हा नियोजन समितीची बैठक घेतली होती. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेची विस्कटलेली घडी, संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे निर्माण झालेला आक्रोश अशा विविध कारणांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जिल्ह्याचे पालकमंत्रीपद स्वतःकडे घेतले. पद घेतल्यानंतर श्री. पवार पहिल्यांदा ३० जानेवारीला जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीसाठी शहरात आले होते. सर्व विभागांच्या प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक व जिल्हा नियोजन समितीची बैठक त्यांनी घेतली.जिल्हा नियोजन समितीमधील निधीच्या अनियमिततेच्या संबंधीच्या




तक्रारींची चौकशीचे आदेशही त्यांनी दिले. चौकशीचा आढावा त्यांनी अधिकाऱ्यांना मुंबईला बोलावूनच घेतला. तत्पूर्वी त्यांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेबाबतही मुंबईत बैठक घेतली होती. मागच्या आठवड्यात त्यांनी बीडला विमानतळ उभारणीची घोषणा केली आहे. दरम्यान, आता ता. दोन एप्रिल रोजी अजित पवार बीडला येणार असल्याची माहिती, जिल्हाध्यक्ष ॲड. राजेश्वर चव्हाण यांनी दिली. प्रशासनालाही त्यांच्या कार्यालयातून तसा निरोप आला आहे. पालकमंत्रीपद स्विकारल्यानंतर अजित पवार ३० जानेवारीला प्रथम जिल्ह्यात आले होते. त्यांनी सकाळ पासूनच बैठकांची सुरुवात केली होती. आता दुसऱ्यांदा जिल्ह्यात येत असल्याने पवार संध्याकाळी प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या बैठका घेणार आहेत. शहरातील एका कार्यक्रमाला उपस्थित राहून हा कार्यक्रम अटोपून पवार बैठक घेणार आहे

# जिल्हा प्रशासनाची भूमिका म्हणजे कुंपनच शेत खातंय

बीड । प्रतिनिधी तालुक्यातील मुळुकवाडी येथील रिन्यु ग्रीन पवनचक्की कंपनीने शेतकऱ्यांना मावेजा पोटी दिलेले धनादेश वठले नसल्याने व विचारणा केल्यानंतर आधिकारी उडवाउडवीची उत्तरे देत टाळाटाळ करत असल्याने शेतकऱ्यांनी तिव्र नाराजी व्यक्त केली आहे.बीड तालुक्यातील बालाघाटावरील पवनचक्की कंपन्यांचा मनमानी कारभार सुरूच असुन जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासनाची भूमिका शेतकऱ्यांना न्याय भुमिकेतुन संरक्षण देण्याऐवजी पवनचक्की कंपन्यांची पाठराखण करण्याची असुन कुंपनच शेत खात असेल तर दाद कोणाकडे मागायची अशी संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली आहे. बीड तालुक्यातील मुळुकवाडी येथील शेतजमिनीत रिन्यु ग्रीन एम.एच.पी.वन.प्रायव्हेट लिमिटेड नवी दिल्ली या कंपनीने पवनचक्की





उभारली आहे. पवनचक्कीची उभारणी करताना काही क्षेत्र पवनचक्की भागात आणि काही क्षेत्र रस्ता शेतातुन गेल्याने पवनचक्की कंपन्यांच्या आधिका-यांनी पंजाब नॅशनल बँकेचे धनादेश खाते क्रमांक ७८३५००२१०००२८६४ वरून शेतकरी अंबादास रामकिसन ढास यांना १,४९,८१३ रूपये चेक नंबर ५२३५२८ , शेतकरी सुभाष रामकिसन ढास यांना १,३८,०६३ चेक नंबर ५२३५२९ आणि शेतकरी शेषेराव रामकिसन ढास यांना १,३८,०६२ रूपये चेक नंबर ५२३५३० अशी एकुण रक्कम ४,२५,९३८ रुपये किंमतीचे धनादेश वठलेच नाहीत. संबंधित प्रकरणात पवनचक्की कंपन्यांच्या आधिका-यांना विचारणा केली असता अगोदर उडवाउडवीची उत्तरे दिली असुन आता फोन घेण्यास सुद्धा टाळाटाळ करत असल्याची तक्रार अंबादास ढास यांनी केली आहे. महिनाभरापूर्वी आमच्या शेतातील ज्वारीच्या उभ्या पिकातुन सहमतीशिवाय पवनचक्की प्रकल्प उभारण्यासाठी पोकलेन, जेसीबी,पिक अप अशा विविध वाहनांची वाहतूक केली. तेव्हा तुम्हाला नुकसान भरपाई देण्यात येईल असे सांगितले. परंतु पवनचक्की प्रकल्प उभारल्यानंतर अद्याप नुकसान भरपाई दिलीच नाही.जवळपास ८०० कडबा आणि ज्वारीची कणसे धुळीमुळे खराब झाली आहेत. अगोदर दिवसातुन ४-५ वेळा मनधरणी करण्यासाठी येणारे अधिकारी आता फोन सुद्धा उचलत नाहीत.या प्रकरणी ऊद्या सोमवारी जिल्हाधिकारी बीड व पोलीस अधीक्षक बीड यांना लेखी तक्रार करणार असल्याचे संदिप ढास यांनी सांगितले. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ऊर्जा आणि कामगार विभागाने दि.२१ आक्टोबर २०२३ रोजी पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय संनियंत्रण समित्यांची स्थापना केली असुन पवन ऊर्जा प्रकल्पाशी निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहाराबाबत कायदेशीर बाबी व अनिश्चितता तपासणे, जमिनीच्या व्यवहारांमध्ये योग्य व्यावहारिक मोबदला मिळत असल्याबाबत खात्री करणे. पवन ऊर्जा प्रकल्पाबाबत समितीकडे आलेल्या तक्रारींची चौकशी करून त्यावर योग्य कारवाई करणे.शेतकरी आणि ग्रामस्थ आणि प्रकल्प विकासक यांच्यामध्ये समन्वय ठेवणे आदि त्यांची कामे असुन जिल्हाधिकारी समितीचे अध्यक्ष तर पोलिस अधीक्षक सदस्य आहेत.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com